महाराष्ट्र शासन
# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर
सेक्टर२७, मिहान पुनर्वसन वसाहत खापरी, नागपूर- ४४११०८(महाराष्ट्र)
e-mail: principal.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in • office.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in
दुरध्वनी क्र. (०७१०३) २९५२२६(P), २९५२२०(O) •Website: www.gcoen.ac.in
"To be an Institution of National Repute Creating Globally Competent Technocrats to Serve the Society"

क्र.शाअमना/शिष्यवृत्ती/2025/ 1857 दिनांक : 23 MAY 2025

## महत्वाची सुचना

विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती " या योजनेंतर्गत सन 2025-26 करीता विदयार्थ्यांकडून अर्ज मागविण्याबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ : 1. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. शिष्यवृ-2024/प्र.क्र.243/तांशि-4/ दिनांक 06/08/2024.
2. मा. संचालक, तंशिसं,म.रा.मुबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.18/ तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/ 2025-26/284, दिनांक 19/05/2025.
3. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. तंशिसं/शैवि/परदेशी शिष्यवृत्ती/2024-25/1889, दिनांक 20/05/2025.

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील" गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" .योजना जाहीर करण्यात आलेली असून शैक्षणिक वर्ष 2025 – 26 करीता Online पध्दतीने अर्ज मागविण्यांची प्रक्रिया संचालनालयाच्या http://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन सुरु करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सर्व अंतिम वर्षातील विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी अधिक माहितीकरीता वरील संकेतस्थळावर तसेच संस्थेच्या www.gcoen.ac.in या संकेतस्थळावर भेट दयावी. जेणेकरुन सदर शिष्यवृत्तीचा लाभ जास्तीत जास्त विदयार्थ्यांना घेणे सोईचे होईल.

सहपत्र : (संदर्भिय पत्र क्र. 2 संलग्न)

प्रबंधक,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,
नागपूर

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

1) सर्व संबंधित विदयार्थ्यांना Whatsapp व्दारे माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
2) सर्व विभागप्रमुख, यांनी आपल्या विभागातील विदयार्थ्यांना याबाबत Whatsapp Group व्दारे तसेच माजी विदयार्थी संघटनेच्या Whatsapp Group व्दारे सदर योजनेची माहिती अवलोकन करुन दयावी.
3) संस्थेचे संकेतस्थळ/सुचनाफलक.



Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४९६/४७७/४२१
ई-मेल-foreignscholarship.dtedesk@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: १८/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२५-२६/ २८०७ दिनांक: ५/७/२०२५

प्रति,
मा. कुलगुरु,

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
२) मुंबई विद्यापीठ, मुंबई
३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
४) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
६) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
७) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
८) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
१०) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
११) कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
१२) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
१३) रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई
१४) सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

विषय: उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सत्र २०२५-२६ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ: १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्रक्र.२१८/तांशि-४, दि. ०४.१०.२०१८

२) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दि. ०६.०९.२०२१

३) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. बैठक-२०२२/प्र.क्र.१८८/तांशि-४, दि.३१.०७.२०२३

४) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२४३/तांशि-३, दि. ०६.०८.२०२४

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधिन दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात येत असून, या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी

QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतात
त्यांना ही शिष्यवृत्ती देय ठरते, व त्याबाबतचे निकष खाली नमूद केले आहेत. दि. ३१ जुलै, २०२३ शासन निर्णयान्वये उच्च व
तंत्र शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून दि. ४ ऑक्टोबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या सर्व
शाखांमधील पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची संख्या १० वरुन ३० व डॉक्टरेटकरिता १०
विद्यार्थी अशा एकूण ४० विद्यार्थ्यांची शाखानिहाय विभागणी करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६
करिता ४० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने
सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता Online पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रीया संचालनालयाच्या
**https://fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावरुन सुरु करण्यांत आलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत:

- उमेदवार व उमेदवाराचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी
  असावेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या
  उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्यायावत (सन २०२५ मधील) QS (Quacquarelli
  Symonds) World Ranking २०० च्या आंत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे/कुटुंबांचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी
  मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२४-२५ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त
  नसावे.
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या
  लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या
  **https://fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर खालील शासन निर्णय उपलब्ध करुन देण्यात
  आलेले आहेत, त्याप्रमाणे या शिष्यवृत्तीबाबतच्या अर्जांची छाननी होणार आहे.

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८
३. दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ ची शासन शुध्दीपत्रक
४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१
५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. बैठक-२०२३/प्र.क्र.१८८/तांशि-४, दिनांक ३१ जुलै २०२३
६. उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२४३/तांशि-४, दि. ०६ ऑगस्ट, २०२४

सदर शिष्यवृत्तीयोजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने दिनांक
१८.०५.२०२५ रोजी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील "अ" दर्जाच्या वर्तमानपत्रातील सर्व आवृत्तांमध्ये जाहिरातही प्रसिध्द
करण्यात आली असून इच्छुक उमेदवारांनी https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज
भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत २५.०६.२०२५ तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे /
कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालयात
दिनांक -२० मे २०२५ ते २७ जून २०२५ (सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत) सादर करावयाची आहेत.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन
खालीलप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी विनंती करण्यात येत आहे.

१) सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.
२) आपल्या विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईट, ट्विटर अकाऊंटवरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित
   करावी.
३) कॅम्पस रेडिओ, विद्यापीठाचे न्युज लेटर या दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन सदर योजनेची माहिती व
   जाहिरात यास प्रसिध्दी द्यावी.

Scanned with OKEN Scanner

४) आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या व्हॉट्सअप ग्रुप तसेच माजी विद्यार्थी संघटनेच्या व्हॉट्सअप ग्रुप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

५) सर्व समाजमाध्यमांकडून (Social Media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु ट्यूब, इ. माध्यमांचा सुध्दा वापर करावा.

६) सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या विद्यापीठाच्या परिपत्रकाव्दारे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे आपल्याशी संलग्नित सर्व संस्थांना, सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात यावे.

आपला

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीकरीता सादर:-

मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांना माहिती साठी सविनय सादर.

प्रत आवश्यक कार्यवाही करीता:-

१) मा. संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे यांना सूचित करण्यात येते की, सदर जाहीरातीनुसार आपापल्या विभागातील सर्व शैक्षणिक संस्थांना या बाबत अवगत करावे.

२) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर यांना निर्देशित करण्यात येते की, सदर जाहीरातीनुसार आपापल्या विभागातील सर्व शैक्षणिक संस्थांना या बाबत अवगत करावे व शेरापत्रकात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

Scanned with OKEN Scanner